DEVELOPMENTAL DISABILITIES ADMINISTRATION (DDA)

# चार वर्षांपर्यंतच्या (4) पात्रतेची मुदत संपत असल्याची अधिसूचना

तारीख:

ग्राहकाचे नाव व पत्ता

प्रतिनिधीचे नाव व पत्ता

विषय: **चार वर्षांपर्यंतच्या (4) पात्रतेची मुदत संपत असल्याची अधिसूचना**

तुमचे मूल सध्या Developmental Disabilities Administration (DDA) चे ग्राहक आहे. तुमच्या मुलाची DDA अंतर्गत पात्रता त्याच्या/तिच्या चौथ्या वाढदिवशी संपते. तुमच्या मुलाची DDA साठीची पात्रता कायम राहावी, म्हणून तुमचे मूल चार वर्षांचे होण्यापूर्वी तुम्ही फेरअर्ज केला पाहिजे. तुमचे मूल पुढीलपैकी एका परिस्थितीत पात्र असल्याचे पुन्हा-निश्चित झाले पाहिजे: बौद्धिक अपंगत्व, प्रमस्तिष्क घात, अपस्मार, स्वमग्नता, बौद्धिक अक्षमतेसारखी चेतासंस्थेची किंवा इतर परिस्थिती.

आम्ही हे पुन्हा-निश्चित करण्यासाठी कशाची गरज आहे हे तुम्हाला समजावे यासाठी आवश्यक असलेल्या दस्तऐवजांचे कोष्टक सोबत जोडले आहे.

**मला फेर-अर्ज कसा करावा लागेल?**

तुमच्या मुलाच्या चौथ्या वाढदिवसाआधी किमान 90 दिवस DDA च्या निवड व पात्रता कर्मचाऱ्यांना फेर-अर्ज पॅकेटची विनंती करण्यासाठी संपर्क करा. तुम्ही पत्र लिहून किंवा खाली दिलेल्या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क करून हे करू शकता. तुम्हाला अर्जाचे पॅकेट टपालाने पाठवले जाईल. तुम्ही पुढील संकेतस्थळाला भेट देऊन अर्जाचे दस्तऐवज ऑनलाईन घेऊ शकता https://www.dshs.wa.gov/dda/consumers-and-families/eligibility.

**मी फेरअर्ज केला नाही तर काय होईल?**

तुम्ही फेर-अर्ज पॅकेटची विनंती केली नाही किंवा तुम्ही तुमच्या मुलाच्या वाढदिवसाआधी किमान 60 दिवसात अर्ज परत केला नाही, तर DDA साठीची पात्रता त्याच्या/तिच्या चौथ्या वाढदिवशी संपेल. तुमच्या मुलाला DDA सशुल्क सेवा मिळत असेल, तर ही सेवा त्याच्या/तिच्या चौथ्या वाढदिवशी संपेल.

**DDA च्या पात्रतेची मुदत संपल्यामुळे विशेष शिक्षण कार्यक्रम किंवा SSI पात्रतेवर परिणाम होणार नाही. यामुळे तुम्हाला मिळत असलेल्या Medicaid, TANF किंवा अन्नाचे स्टँप यासारख्या कोणत्याही इतर DSHS सेवांवर परिणाम होणार नाही.**

कृपया लवकरात लवकर प्रतिसाद द्या, मात्र तो तुमच्या मुलाच्या चौथ्या वाढदिवसाच्या किमान 90 दिवस आधी असावा. आम्हाला तुमच्याकडून काही प्रतिसाद मिळाला नाही, तर आम्ही असे गृहित धरू की तुम्हाला तुमच्या मुलाची DDA साठीची पात्रता सुरू ठेवण्याची इच्छा नाही. तुमचे मूल वयाच्या चौथ्या (4) वर्षी DDA साठी पात्र असल्याचे योग्य ते दस्तऐवज असल्याशिवाय DDA सेवांसाठी पात्रतेची मुदत त्याच्या/तिच्या चौथ्या (4[थ्या]) वाढदिवशी संपेल.

तुम्हाला काही प्रश्न असतील किंवा पॅकेट मागविण्याची इच्छा असेल, तर कृपया संपर्क करा

| नाव | दूरध्वनी क्रमांक | ईमेल पत्ता |
|---|---|---|

पात्रता नियंत्रित करणाऱ्या राज्याच्या नियमांची एक प्रत विनंती केल्यास किंवा पुढील पत्त्यावर ऑनलाईन उपलब्ध होईल https://www.dshs.wa.gov/dda/consumers-and-families/eligibility.

कार्बन प्रत: ग्राहकाची फाईल

## आवश्यक दस्तऐवजांचे कोष्टक

| अपंगत्वाची स्थिती | वय | निदान | निदान करणारे अधिकारी | इतर नोंदी |
|---|---|---|---|---|
| विकासातील विलंब | वय 4 ते 9 | विकासातील विलंब | विकासाचे मूल्यांकन किंवा मूल्यमापन करण्यासाठी पात्र व्यावसायिक | वय चार (4) ते नऊ (9) – सरासरीपेक्षा कमी 1.5 चे प्रमाणित विचलन असलेले तीन किंवा चार विलंब किंवा घटनाक्रमानुसार वयाच्या 25 % जे गेल्या 12 महिन्यातील सध्याच्या मूल्यमापनावर आधारित असेल. |
| बौद्धिक अपंगत्व | वय 4 व त्याहून मोठे | बौद्धिक अक्षमता | एक परवानाधारक मानसोपचारतज्ञ, वॉशिंग्टन प्रमाणित शालेय मानसोपचारतज्ञ किंवा नॅशनल असोसिएशन ऑफ स्कूल सायकलॉजिस्टद्वारे प्रमाणित इतर शालेय मानसोपचारतज्ञ | संपूर्ण मानसिक अहवाल ज्यामध्ये फूल स्केल IQ स्कोअर सरासरीपेक्षा कमी दोन प्रमाणभूत विचलनांहून अधिक असला पाहिजे व अनुकूलन कौशल्य चाचणीचे गुण सरासरीपेक्षा कमी दोन प्रमाणभूत विचलनांपेक्षा अधिक असले पाहिजेत हा गेल्या 36 महिन्यात पूर्ण केलेला असला पाहिजे. |
| प्रमस्तिष्क घात | वय 4 व त्याहून मोठे | प्रमस्तिष्क घात<br>चतुरंग घात<br>पक्षाघात<br>उभयांगघात | परवानाधारक डॉक्टर | वयाच्या तिसऱ्या (3) वर्षापूर्वीपासून सुरूवात व दोन किंवा अधिक गोष्टींसाठी दररोज थेट शारीरिक मदतीची गरज लागते याचे समर्थन करणारी माहिती (शौचाला जाणे, अंघोळ, अंघोळ, कपडे घालणे, हालचाल किंवा संवाद साधणे). |
| अपस्मार | वय 4 व त्याहून मोठे | अपस्मार किंवा फेफरे विकार | बोर्डाने प्रमाणित केलेला चेताभिषक | वैद्यकीय इतिहास व चेतासंस्थेच्या चाचणीवर आधारित निदान, अनियंत्रित व सतत किंवा वारंवार फेफरे भरत असल्याची डॉक्टरांकडून किंवा चेताभिषकाकडून पुष्टी व अनुकूलन कौशल्य चाचणीतून अनुकूलन कार्यामध्ये बरीच मर्यादा असल्याचे जी सरासरीपेक्षा कमी दोनपेक्षा अधिक प्रमाणभूत विचलनांहून अधिक असल्याचे दिसून आले आहे. |
| स्वमग्नता<br>(प्रति DSM-IV-TR) | वय 4 व त्याहून मोठे | स्वमग्नता किंवा स्वमग्नता विकार प्रति 299.00 DSM-IV-TR मध्ये | एक परवानाधारक मानसोपचारतज्ञ, एक परवानाधारक डॉक्टर किंवा स्वमग्नता केंद्राशी, विकास केंद्राशी किंवा नैपुण्य केंद्राशी संबंधित ARNP किंवा बोर्डाने प्रमाणित केलेला: चेताभिषक, मानसोपचार तज्ञ किंवा विकास व वर्तनविषयक बालरोगतज्ञ | निदानाचे सर्व निकष पूर्ण करणारे प्रति DSM-IV-TR चे संपूर्ण मूल्यमापन, पाच (5) वर्षे वयापूर्वी सामाजिक, भाषाविषयक, संवाद कौशल्य किंवा प्रतिकात्मक किंवा काल्पनिक खेळांमध्ये विलंब किंवा व्यवस्थित कार्यशील नसल्याचा पुरावा व अनुकूलन कौशल्य चाचणीमध्ये अनुकूलन कार्यात बरीच मर्यादा म्हणजे सरासरीपेक्षा दोनहून अधिक प्रमाण विचलने कमी असल्याचे दिसून येणे. |
| स्वमग्नतेशी संबंधित विविध विकार<br>(प्रति DSM-5) | वय 4 व त्याहून मोठे | स्वमग्नतेशी संबंधित विविध विकार 299.00 प्रति DSM-5 | एक परवानाधारक मानसोपचारतज्ञ, एक परवानाधारक डॉक्टर किंवा स्वमग्नता केंद्राशी, विकास केंद्राशी किंवा नैपुण्य केंद्राशी संबंधित ARNP किंवा बोर्डाने प्रमाणित केलेला: चेताभिषक, मानसोपचार तज्ञ किंवा विकास व वर्तनविषयक बालरोगतज्ञ | निदानाचे सर्व निकष पूर्ण करणारे प्रति DSM-V चे संपूर्ण मूल्यमापन, पाच (5) वर्षे वयापूर्वी विलंब किंवा व्यवस्थित कार्यशील नसल्याचा पुरावा, अनुकूलन कौशल्य चाचणीमध्ये अनुकूलन कार्यात बरीच मर्यादा म्हणजे दोनहून अधिक प्रमाण विचलन दिसून येणे आणि FSIQ सरासरीपेक्षा एक किंवा अधिक प्रमाण विचलन कमी असणे. |

**आवश्यक दस्तऐवजांचे कोष्टक**

| अपंगत्वाची स्थिती | वय | निदान | निदान करणारे अधिकारी | इतर नोंदी |
|---|---|---|---|---|
| बौद्धिक अपंगत्वासारखी चेतासंस्थाविषयक किंवा इतर स्थिती | वय 4 व त्याहून मोठे | चेतासंस्थाविषयक किंवा क्रोमोझोमशी संबंधित विकार ज्यामुळे बौद्धिक व अनुकूलन कौशल्य कमी होते असे मानले जाते | परवानाधारक डॉक्टर | फूल स्केल IQ स्कोअर सरासरीपेक्षा कमी 1.5 प्रमाणभूत विचलनांहून अधिक असला पाहिजे व अनुकूलन कौशल्य चाचणीमध्ये अनुकूलन कार्यावर बरीच मर्यादा असल्याचे दिसून आले पाहिजे जी सरासरीपेक्षा कमी दोन प्रमाणभूत विचलनांहून अधिक असली पाहिजे तसेच हे गेल्या 36 महिन्यात पूर्ण केले असले पाहिजे. |

**सूचना: हा अर्ज केवळ सर्वसाधारण मार्गदर्शक आहे व DDA ला कदाचित अतिरिक्त माहिती किंवा मूल्यमापनाची आवश्यकता असू शकते. हे दस्तऐवजीकरण पात्रता निश्चित करण्याची पहिली पायरी आहे. DDA पात्रता प्रति WAC प्रकरण 388-823 नुसार निश्चित केली जाते.**